# तुम्हाला
# विस्मरणाचा
# त्रास आहे का?

तुमच्या पैकी बऱ्याच जणांनी डिमेंशिया किंवा अल्झायमर्स हे शब्द ऐकले असतील. डिमेंशिया हा विस्मरणाचा आजार आहे हे ही कदाचित माहीत असेल. (अल्झायमर्स हे डिमेंशिया होण्याचे प्रमुख कारण आहे). तसे पाहिले तर विस्मरण ही एक सामान्य, प्रत्येक जण अनुभव घेत असलेली बाब आहे. पण जेव्हा ते अती होते, अशा व्यक्तीची काळजी त्याच्या कुटुंबियांना वाटते तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही.

ज्येष्ठांना विस्मरणाचा आजार होण्याची शक्यता जास्त असली तरी प्रत्येक वृद्धाला हा आजार होत नाही. डिमेंशिया हा एक मेंदूचा आजार आहे ज्यामध्ये स्मरणशक्तीवर हल्ला होऊन विचारक्षमता, नियोजनक्षमता, संवादक्षमता, सारासार विचारशक्ती इत्यादी मेंदूच्या क्षमतांवर परिणाम होतो. जसे – एकाग्रतेत कमतरता, स्वभावात बदल, उत्साह कमी होणे किंवा निराशा वाटणे, रोजच्या ओळखीच्या रस्त्यावर गोंधळायला होणे, नेहेमीची कामे करणे अवघड जाणे, संभाषण करतांना गडबडून जाणे. अलिकडे घडलेले प्रसंग न आठवणे.

विस्मरणाच्या वाढत्या तक्रारी घेऊन येणाऱ्यांना योग्य मदत मिळावी ह्या हेतूने २०१० साली दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या न्युरॉलॉजी विभागामार्फत मेमरी क्लिनिक चालू करण्यात आले. तुम्हाला किंवा तुमच्या परिचयात ह्या आजाराबाबत मार्गदर्शन हवे असेल तर खालील पत्त्यावर संपर्कसाधा –

**मेमरी क्लिनिक**

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, सेंटर फॉर ब्रेन अ‍ॅन्ड स्पाइन डिसॉर्डर्स,
सुपर स्पेशालिटी बिल्डींग, एरंडवणे, कोथरूड. पुणे – ४११ ००४.
फोन –(०२०)४९१५३२३४
दर सोमवार, गुरुवार आणि शुक्रवार, सकाळी ११ ते १